**प्रारुप विकास योजना- छत्रपती संभाजीनगर (मूळ हद्द सुधारित + वाढीव हद्द)**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १६२(१) अन्वये आदेश निर्गमित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
चौथा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई : ४०० ०३२

**शासन निर्णय क्र. टिपीएस-३०२०/५१४/प्र.क्र.६९/२०२०/नवि-३०,**

**दिनांक : ०७.११.२०२३**

**शासन निर्णय:-** सोबतचे अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,***

URBAN DEVELOPMENT DEPTT.
MANTRALAYA, MUMBAI-32

(प्रतिभा भदाणे)
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (नवि-१) , नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
४) विभागीय सह संचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
५) आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर.
६) नियुक्त अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
७) सहायक संचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर.
८) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर.

प्रस्तुत प्रकरणी त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात छत्रपती संभाजीनगर विभाग, भाग-१ या पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ०५

प्रती या विभागास, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, विभागीय सह संचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर, सहायक संचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर, यांना देण्यात याव्यात.

९) निवडनस्ती (कार्यासन नवि-३०)

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

चौथा मजला, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई : ४०० ०३२

**दिनांक : ०७.११.२०२३**

## अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६:*

**क्र.टिपीएस-३०२०/५१४/प्र.क्र.६९/२०२०/नवि-३०:** ज्याअर्थी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या वाढीव क्षेत्राची प्रारूप विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे निर्देशिलेले) चे कलम कलम २३(१) मधील तरतुदीनुसार (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा दि.२६.०५.२०१० रोजी जाहीर केला;

अणि ज्याअर्थी, छत्रपती संभाजीनगर शहराची वाढीव हद्दीची विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभाग, पुरवणी भाग १ मध्ये दि.०३.०२.२०१६ रोजी प्रसिद्ध केली;

अणि ज्याअर्थी, श्री.गोविंद बाजीराव नवपुते यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे छत्रपती संभाजीनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेबाबतचे उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वयेचे प्रसिध्दीकरण रद्द करणे व इतर विनंतीसह रिट याचिका क्र.१९८१/२०१६ दाखल करण्यात आली होती. सदर रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०५.०४.२०१६ रोजीच्या आदेशान्वये कलम २६ अन्वयेची पुढील कार्यवाही सुरु ठेवण्याची मुभा देऊन प्राप्त आक्षेपांवर अंतिम निर्णय घेऊ नये असे आदेशित केले. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दि.०५.०८.२०१६ रोजीच्या आदेशान्वये कलम २६ अन्वये प्रसिध्दीकरण व कलम ३० अन्वये मान्यतेसाठी शासनास सादर करण्यासाठी कलम २१(४अे) अन्वयेच्या तरतुदी लागू राहतील, असे आदेशित करुन दि.०५.०४.२०१६ रोजीचे आदेश कायम असल्याचे स्पष्ट केले. सदर आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे एसएलपी क्र.२५९६७/२०१६ दाखल करण्यात आली. यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०७.११.२०१६ रोजीच्या आदेशान्वये, मा.उच्च न्यायालयाचे दि.०५.०८.२०१६ रोजीचे आदेश कायम असल्याचे आदेश दिले.

अणि ज्याअर्थी, रिट याचिका क्र.१९८१/२०१६ मधील दि.०५.०८.२०१६ रोजीच्या आदेशाविरुध्द छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात सिव्हील अपील क्र.२२३७/२०२० दाखल

केले. यामध्ये दि.१७.०४.२०२० रोजीच्या आदेशान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाने, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्ताक्षेप करण्याचे कारण दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे;

अणि ज्याअर्थी, शासनाने दि.१५.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीची विकास योजना सुधारीत करण्याचे + वाढीव हद्दीची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली) संयुक्त विकास योजना तयार करण्यासाठी निदेश दिले.

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्राची प्रारूप विकास योजना, उक्त अधिनियमाच्या कलम २३(१) मधील तरतुदीनुसार (यापुढे उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र.२६८, दि.१९.०१.२०२२ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभाग, पुरवणी भाग १ मध्ये दि.१७-२३.०३.२०२२ रोजी प्रसिद्ध केली;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीस अनुसरून, सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे पत्र क्र.७५१, दि.०२.०५.२०२२ अन्वये दिलेल्या मान्यतेस अधिन राहून प्रशासक, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.१२.०५.२०२२ रोजीचे पत्र क्र.१०५० अन्वये, उपसंचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक छत्रपती संभाजीनगर यांना उक्त क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी "नगर रचना अधिकारी" म्हणून नियुक्त केले आहे (यापुढे उक्त अधिकारी" असे उल्लेखलेली) ;

आणि ज्याअर्थी, श्री.गोविंद बाजीराव नवपुते यांनी, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे अवमान याचिका क्र.५८२/२०२२ दाखल केली होती. सदर अवमान याचिकेमध्ये दि.०३.०८.२०२३ रोजीच्या आदेशानुसार, आता, छत्रपती संभाजीनगर शहराच्या मूळ हद्दीची विकास योजना सुधारित करण्याचे + वाढीव हद्दीची विकास योजना तयार करणेबाबत, उक्त अधिनियमाचे कलम २६ पासून कलम ३० पर्यंतची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करणेसाठी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम २१(४अे) अन्वयेच्या आदेश क्र.टिपीएस-३०२०/५१४/प्र.क्र.६९/२०२०/नवि-३०, दि.३१.०८.२०२३ अन्वये श्री.श्रीकांत देशमुख, उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई, कलम "अधिकारी" नियुक्ती केली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयानुसार, सदर अधिकारी नियुक्त झाल्यानंतर, विकास योजना विशेष घटक छत्रपती संभाजीनगर हे, कलम २५ अन्वये केलेली कार्यवाही सदर नियुक्त अधिकारी यांचेकडे सुपूर्द करेल;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकरणी आवश्यक त्या चौकशी केल्यानंतर, छत्रपती संभाजीनगर शहराच्या मूळ हद्दीची विकास योजना सुधारित करण्याचे + वाढीव हद्दीची विकास योजना तयार करणेबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पार पाडण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम १६२(१) अन्वये विशेष अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आता, त्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम १६२ चे पोट-कलम (१) मधील तरतूदीप्रमाणे, छत्रपती संभाजीनगर शहराच्या मूळ हद्दीची विकास योजना सुधारित करण्याचे + वाढीव हद्दीची विकास योजना तयार करणेबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पार पाडण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम १६२ (१) अन्वये विशेष अधिकारी म्हणून श्री.श्रीकांत देशमुख, उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांची खालील अटी / शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

**अटी / शर्ती -**

१. सदर नियुक्त अधिकारी उक्त अधिनियमाचे कलम २६ ते कलम ३० नुसार विकास योजना मान्यतेसाठी शासनास सादर करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही पार पाडतील व त्यासाठी आवश्यक असलेल्या उक्त नियोजन प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करतील.

२. मा.न्यायालयाच्या दि.०३.०८.२०२३ रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार, छत्रपती संभाजीनगर विकास योजना विशेष घटक यांनी, छत्रपती संभाजीनगर शहराच्या मूळ हद्दीची प्रारुप सुधारीत विकास योजना + वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजनेबाबत, उक्त अधिनियमाचे कलम २५ पर्यंत केलेली संपूर्ण कार्यवाही / कागदपत्रे / नकाशे / संगणकीय कार्यवाहीचे साहित्य इत्यादी, सदर नियुक्त अधिकारी यांचेकडे, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ सुपूर्द करावे.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,***

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32

(प्रतिभा भदाणे)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**
MADAM KAMA MARG, HUTATMA RAJGURU CHOWK,
MANTRALAYA, MUMBAI - 400 032.

**Date –** 07.11.2023

## NOTIFICATION

***The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966:***

**No.TPS-3020/514/CR-69/2020/UD-30:-** Whereas, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Planning Authority") had declared its intention to prepared Draft Development Plan of its Extended Limits on dated the 26.05.2010, under section 23*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act. No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act")

And whereas, the Draft Development Plan of Extended Limits of Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation has been published in the *Official Gazette*, dated the 03.02.2016;

And whereas, Shri.Govind Bajirao Navpute had filed Writ Petition No.1981/2016 before the Hon`ble Bombay High Court, Bench at Chhatrapati Sambhajinagar with prayer to cancel the publication of Draft Development Plan of Extended Limits of Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation and other requests. And the Hon'ble High Court, *vide* its Order dated 05.04.2016, has allowed to carry on the further action under section 26 of the said Act and also directed not to take final decision on the suggestion / objection received. Thereafter, the Hon'ble High Court, *vide* its Order dated 05.08.2016, has clarify that, its order dated the 05.04.2016 shall be remain operative in the meanwhile, and mentioned that, the provision of section 21(4A) of the said Act will be applicable for the publication under section 26 and submission under section 30 of the said Act. A S.L.P. No.25967/2016 has been filled against the order dated 05.08.2016, wherein the Hon'ble Supreme Court *vide* its order dated 07.11.2016 has upheld Hon'ble High Court's order dated the 05.08.2016;

And whereas, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation has filled Civil Application No.2237/2020 against the order dated 05.08.2016 in Writ Petition No.1981/2016, wherein the Hon'ble Supreme Court *vide* its order dated 17.04.2020, has made its ruling that there is no reason to interfere with the judgement of Hon'ble High Court;

And whereas, the Government *vide* its letter dated 15.10.2018, has directed to prepared Composite Draft Development Plan by revising Development Plan of Original Limit + preparing Development Plan of Extended Limits (hereinafter referred to as "the said Area").

And whereas, the Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation *vide* its Resolution No.268, dated the 19.01.2022, has declared its intention under Section 23 of the

said Act to prepare Draft Development Plan for the said Area and notice of such declaration was published in the *Official Gazette*, Chhatrapati Sambhajinagar Division Supplement dated the 17-23.03.2022;

And whereas, the Administrator, Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation *vide* its letter No.1050, dated the 12.05.2022, has appointed the Deputy Director of Town Planning, Development Plan Special Unit Chhatrapati Sambhajinagar as "Town Planning Officer" to prepare Draft Development Plan for the said Area, after getting the concurrence from the Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar *vide* his letter No.751, dated the 02.05.2022, as per the provisions of section 24 of the said Act;

And whereas, Shri.Govind Bajirao Navpute had filed Contempt Petition No.582/2022 before the Hon'ble Bombay High Court, Bench at Chhatrapati Sambhajinagar. As per Hon'ble High Court's order dated the 03.08.2023, the Government, *vide* its Order No.TPS3020/514/CR-69/2020/UD-30, dated the 31.08.2023, has appointed Shri. Shrikant Deshmukh, Deputy Director, Town Planning, Greater Mumbai has been appointed as an Officer to follow all the legal procedure stipulated under section 26 to 30 of the said Act, to revise the Development Plan of Original Limits + to prepare the Development Plan of Extended Limits. After this appointment, as per the decision of the Hon'ble High Court, the Development Plan Special Unit Chhatrapati Sambhajinagar, has to handover the records under section 26 of the said Act, to the Officer appointed;

And whereas, after making necessary enquiries, the State Government is of the opinion that it is necessary to make appointment of the Special Officer under section 162(1) of the said Act to complete the proceedings for publishing the said Draft Development Plan under section 26 and to submit the said Draft Development Plan under section 30 of the said Act, within the stipulated period;

Now, therefore, as provided in sub-section *(1)* of section 162 of the said Act, Shri. Shrikant Deshmukh, Deputy Director of Town Planning, Greater Mumbai is hereby appointed as "an Officer" by the State Government to complete the proceedings for publishing the said Draft Development Plan under section 26 and to submit the said Draft Development Plan under section 30 of the said Act, within the stipulated period, subject to the following terms / conditions;

**Terms / Conditions :-**

1) The appointed Officer shall carry out all necessary proceedings for submitting the Development Plan to the Government for approval in accordance with Section 26 to

Section 30 of the said Act and shall exercise all powers of the said Planning Authority necessary for the same.

2) As stipulated in the Hon'ble High Court's order dated the 03.08.2023, Development Plan Special Unit Chhatrapati Sambhajinagar should handover the entire proceeding / documents / maps / material of the computerized proceedings immediately etc., to the Officer appointed, as per the order of Hon'ble High Court.

This Notification is available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(Pratibha Bhadane)
**Joint Director to Government**